आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय  बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
०७ मे २०२५ - बुधवार

**ठळक बातम्या**

- ऑपरेशन सिंदूरमधे पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधे, नागरी आणि लष्करी आस्थापनांना धक्का न लावता, ९ दहशतवादी तळ उद्धवस्त

- 'ऑपरेशन सिंदूर' चं सर्वपक्षीय नेत्यांकडून कौतुक/ विविध देशांकडून पाठिंबा

- कोळसा वापर आणि वाटप करण्याच्या सुधारित ‘शक्ती’ योजनेला केंद्रीय मंत्रमंडळाच्या अर्थ व्यवहार विषयक समितीची मान्यता

- छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकीत २२ नक्षलवादी ठार

**आणि**

- महिला क्रिकेटमधे, एकदिवसीय तिरंगी मालिकेत आज कोलंबो इथं झालेल्या सामन्यात भारताचा दक्षिण आफ्रिकेवर २३ धावांनी विजय

<><><><><>

पाकिस्तान आणि पाकव्याप्त काश्मीरमधे भारतीय संरक्षण दलानं राबवलेल्या ऑपरेशन सिंदूरमधे दहशतवाद्यांचे ९ तळ उद्धवस्त झाले आहेत. परराष्ट्र व्यवहार विभागाचे सचिव विक्रम मिस्त्री, भारतीय लष्कराच्या कर्नल सोफिया कुरेशी आणि हवाई दलाच्या विंग कमांडर व्योमिका सिंग यांनी दिल्लीत झालेल्या संयुक्त वार्ताहर परिषदेत ही माहिती दिली. पाकिस्तानच्या कोणत्याही नागरी वस्तीला किंवा लष्करी आस्थापनांना धक्का न लावता ही मोहीम फत्ते झाल्याचं त्यांनी सांगितलं.

ऑपरेशन सिंदूर नंतर केंद्रीय मंत्रिमंडळाची बैठक प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखाली नवी दिल्ली इथं झाली. मंत्रिमंडळ सदस्यांनी या मोहिमेबद्दल प्रधानमंत्र्यांचं अभिनंदन केलं आणि त्यांच्या नेतृत्वावर विश्वास व्यक्त केला. त्यानंतर प्रधानमंत्र्यांनी दुपारी राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांची भेट घेऊन त्यांना ऑपरेशन

सिंदूरबद्दल माहिती दिली. या मोहिमेच्या पार्श्वभूमीवर केंद्रसरकारनं उद्या सर्वपक्षीय बैठक बोलावली आहे.

<><><><><>

भारतीय संरक्षण दलानं राबवलेल्या 'ऑपरेशन सिंदूर'चं सर्वपक्षीय नेत्यांनी कौतुक केलं आहे.

पहलगाममध्ये देशातल्या निरपराध बांधवांच्या निर्घृण हत्येला भारतानं दिलेली प्रतिक्रिया म्हणजे ऑपरेशन सिंदूर आहे असं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी म्हटलं आहे. ऑपरेशन सिंदूर मधे भारतीय सशस्त्र दलांनी धाडस आणि शौर्याचं प्रदर्शन करत इतिहास रचला असे गौरवोद्गार संरक्षण मंत्री राजनाथ सिंह यांनी काढले. जगानं दहशतवादाबाबत झीरो टॉलरन्स धोरण दाखवलं पाहिजे असं मत परराष्ट्रमंत्री एस. जयशंकर यांनी व्यक्त केलं आहे. माहिती आणि प्रसारण मंत्री अश्विनी वैष्णव तसंच राज्यमंत्री एल मुरुगन यांनीही या मोहिमेच्या यशाबद्दल आनंद व्यक्त केला आहे.

आपल्याला भारतीय लष्कराचा अभिमान आहे असं लोकसभेतले विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनी समाज माध्यमावर म्हटलं आहे. काँग्रेस दहशतवादाविरोधात कोणतीही निर्णायक कारवाई करण्यासाठी लष्कर आणि सरकारच्या पाठीशी ठामपणे उभी आहे असं काँग्रेसचे अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांनी म्हटलं आहे. ऑपरेशन सिंदूरद्वारे भारतीय सैन्यानं केलेली कामगिरी अतुलनीय आहे तसचं पहलगाम इथं दहशतवाद्यांच्या हल्ल्यात बळी गेलेल्या पर्यटकांना ही खरी श्रद्धांजली असल्याचं केंद्रीय सामाजिक न्याय राज्यमंत्री रामदास आठवले यांनी म्हटलं आहे. भारताच्या सार्वभौमत्वाचं रक्षण करणाऱ्या भारतीय सैन्यदलावरचा भारतीयांचा विश्वास सार्थ ठरवत हवाई दलानं पहलगाम दहशतवादी हल्ल्याचा बदला घेतला अशी प्रतिक्रिया माजी संरक्षण मंत्री शरद पवार यांनी दिली.

<><><><><>

भारतानं केलेल्या ऑपरेशन सिंदूर बद्दल साऱ्या जगानं भारताला पाठिंबा दिला आहे.

भारताला दहशतवादापासून स्वसंरक्षणाचा अधिकार असल्याचं इस्राएलने म्हटलं आहे. भारतातले इस्राएलचे राजदूत रुवेन अझर यांनी म्हटलं आहे की निरपराधांचे बळी घेणाऱ्या दहशतवाद्यांना तोंड लपवायला जागा नाही हे समजलं पाहिजे.

रशियाच्या परदेश मंत्रालय प्रवक्त्या मारिया झाखारोव्हा यांनी कोणत्याही प्रकरच्या दहशतवादी कृत्याचा रशिया निषेध करत असल्याचं सांगून दहशतवादाचा बीमोड करण्यासाठी जागतिक स्तरावर सहकार्याचं आवाहन केलं आहे.

जपानचे परराष्ट्र मंत्री इवाया ताकेशी यांनी दहशतवादाविरोधातल्या ठाम भूमिकेचा पुनरुच्चार करत, दोन्ही देशांनी संयम ठेवावा, असं आवाहन केलं आहे. जर्मनी दोन्ही देशांच्या संपर्कात असून त्यांच्या परराष्ट्र व्यवहार मंत्रालयानंही शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे. संयुक्त अरब अमिरातीचे  उपप्रधानमंत्री शेख अब्दुल्ला बिन झायेद अल नाहयान यांनी भारत आणि पाकिस्तानशी संपर्क साधून शांतता राखण्याचं आवाहन केलं आहे.

कतारचे प्रधानमंत्री शेख मोहम्मद बिन अब्दुर्रहमान बिन जासिम अल थानी यांनी परराष्ट्रमंत्री डॉ. एस जयशंकर यांच्याशी संवाद साधून शांतता आणि संवादाच्या मार्गाने तोडगा काढण्यासाठी मदत देऊ केली आहे.

पहलगाम हल्ल्याचा कठोर शब्दात निषेध करणारे संयुक्त राष्ट्रांचे महासचिव अँटोनियो गुटेरस यांनी ऑपरेशन सिंदूर नंतर चिंता व्यक्त केली असून दोन्ही देशांनी संयम बाळगावा असं आवाहन केलं आहे.

<><><><><>

२६ निरपराधांचे बळी घेणाऱ्या पहलगाम दहशतवादी हल्ल्याला भारतानं चोख प्रत्युत्तर दिलं असल्याची प्रतिक्रीया राज्यात उमटत आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून....

**होल्ड व्हाईस कास्ट**

*कुठलाही दहशतवाद भारत सहन करणार नाही, हे भारतीय सैन्यदलानं दाखवून दिलं आहे. ऑपरेशन सिंदूर मोहिमेनं हे सिद्धच केलं आहे. या हवाई हल्ल्ल्यानं दहशतवाद्यांचे तळ आणि प्रशिक्षण केंद्र उद्धवस्त केली आहेत. मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी सैन्यदलाचं कौतुक तर केलंच शिवाय प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांचं अभिनंदन करुन त्यांच्याप्रती कृतज्ञता व्यक्त केली..*

**देवेंद्र फडनवीस**

*उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी या कारवाईबद्दल समाधान व्यक्त करताना सांगितलं..*

**एकनाथ शिंदे..**

*सैन्यदलाच्या कारावाईबद्दल लष्करी दृष्टीकोनातून प्रकाश टाकताना हेमंत यांनी विस्तृत प्रतिक्रिया दिली.*

**हेमंत महाजन**

*तर निवृत्त लष्करी अधिकारी कर्नल शैलेश रायकर यांनी सांगितलं…*

**होल्ड - बाईट - शेलेश रायकर**

*सैन्य दलाच्या या कारवाईबद्दल, दहशतवादी हल्ल्यात मृत पावलेल्या पर्यटकांचे नातेवाईक म्हणाले...*

**शहिदांचे नातेवाईक**

*सैन्यदलाच्या या कारवाईनंतर, आता भारताकडे वाकड्या नजरेनं पाहणाऱ्या दहशतवादी संघटना आणि त्यांचे पाठीराखे पुरेपुर बोध घेतील, हे नक्की.*

**<><><><><>**

कोळसा वापर आणि वाटप करण्याच्या सुधारित ‘शक्ती’ योजनेला प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या अध्यक्षतेखालच्या अर्थ व्यवहार विषयक मंत्रीमंडळ समितीनं मान्यता दिली आहे. केंद्र, राज्य आणि स्वतंत्र औष्णिक वीज केंद्रांना कोळसा पुरवठा करण्यासाठी या योजनेला मंजुरी देण्यात आली आहे.

देशातल्या पाच नव्या आयआयटी च्या शैक्षणिक आणि पायाभूत सुविधांचा विस्तार करायला केंद्रीय मंत्रीमंडळानं आज मंजुरी दिली.

<><><><><>

छत्तीसगडमध्ये झालेल्या चकमकीत २२ नक्षलवादी ठार झाले आहेत. छत्तीसगडच्या विजापूर जिल्ह्यात करगुट्टा टेकडीवर आज सकाळी सीआरपीएफ, जिल्हा राखीव दल, स्पेशल टास्क फोर्स आणि नक्षलवादी यांच्यात चकमक सुरू झाली. नक्षलविरोधी मोहीम अद्याप सुरू आहे.

<><><><><>

महिला क्रिकेटमधे, एकदिवसीय तिरंगी मालिकेत आज कोलंबो इथं झालेल्या सामन्यात भारतानं दक्षिण आफ्रिकेवर २३ धावांनी विजय मिळवला. भारतानं प्रथम फलंदाजी करताना निर्धारित ५० षटकात ९ गडी गमावून ३३७ धावा केल्या. जेमिमा रॉड्रिग्जनं १२३ धावा केल्या. ती सामन्यातली सर्वोत्कृष्ट खेळाडू ठरली. दिप्ती शर्मानं ९३, तर स्मृती मंधानानं ९१ धावांचं योगदान दिलं.

भारताच्या धावसंख्येचा पाठलाग करताना श्रीलंकेला ५० षटकात ७ गडी गमावून ३१४ चं धावा करता आल्या. भारतातर्फे अमनज्योत कौरनं ३, तर दिप्ती शर्मानं २ बळी मिळवले.

//<><><><><>//